Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

## * Central Library *

Accredited by
NBA
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 06/06/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष



## प्रसिद्ध मराठी विश्वकोशकार गणेश भिडे

गणेश रंगो भिडे हे प्रसिद्ध मराठी विश्वकोशकार होते. त्यांचा जन्म ६जून १९०९ रोजी सांगलीतील अष्टे येथे झाला. त्यांचे बहुतेक सर्व वास्तव्य कोल्हापुरात होते. त्यांचे शिक्षण एम.ए., बी.टी. इतके झाल होते. मॅट्रिकनंतर ते प्रभात फिल्म कंपनीत नोकरी करीत होते. त्यावेळी विणकाम व पाकशास्त्र या विषयांवरील पुस्तके तसेच हाऊसहोल्ड एन्सायक्लोपीडिया पाहून मराठीत अशा प्रकारची पुस्तके असणे आवश्यक आहे, अशा विचाराने भिडे यांनी दोनच दिवसांत ३५ विषयांची यादी तयार केली. पुढे त्यांनी २० एप्रिल १९३१ रोजी मा. त्र्यं. पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली एका समारंभात व्यावहारिक ज्ञानकोश मंडळाची स्थापनाही केली. २० मार्च १९३३ रोजी या मंडळाचे 'लिमिटेड कंपनी'मध्ये रूपांतर होऊन त्याद्वारे १९३५ मध्ये प्रस्तुत कोशाचा पहिला भाग प्रसिद्ध झाला. स्वतः भिडे यांनी सर्वत्र हिंडून त्याची विक्री केली. व्यावहारिक म्हणजे जीवनास आवश्यक असे ज्ञान देणाऱ्या या कोशाचे बहुतेक लेखन अप्रसिद्ध पण व्यासंगी होते.

लेखनाचा उत्तम दर्जा, चित्रे व छायाचित्रे, सुबक बांधणी आणि त्यामानाने किंमत कमी ही कोशाची वैशिष्ट्ये म्हणावी लागतील. स्वातंत्र्योत्तर काळात नवे ज्ञान देणारा अभिनव मराठी ज्ञानकोश प्रसिद्ध झाला. त्याचे ५ खंडच प्रसिद्ध होऊ शकले. 'सिनेमासृष्टी' हे मराठीतील चित्रपटविषयक पहिले नियतकालिक १९३२ च्या सुमारास त्यांनी सुरू केले. 'व्यावहारिक ज्ञानकोश खंड' १-५' (१९३५-४०), 'बालकोश खंड, १' (१९४२), 'अभिनव ज्ञानकोश खंड, १-५' (१९६३-७९), 'फोटो कसे घ्यावेत?', 'सावरकरसूत्रे', 'कोल्हापूर दर्शन १९७१', व 'कलामहर्षी बाबूराव पेंटर' (१९७८) इत्यादी लेखन त्यांनी केले. अशा या प्रसिद्ध विश्वकोशकाराचे ८ जून १९८१ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Jun 06, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401